पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी – ४११ ०१८, नगरसचिव कार्यालय
क्रमांक – नस/४/कावि/ ११२२ /२०१३
दिनांक – २८ / ११ / २०१३

प्रति,

मा.....................................
सदस्य, शहर सुधारणा समिती,
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी – ४११ ०१८.

विषय – पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.शहर सुधारणा समितीची सभा दिनांक ०४/१२/२०१३ रोजी आयोजित केलेबाबत.

महोदय/महोदया,

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.शहर सुधारणा समितीची पाक्षिक सभा बुधवार दिनांक ०४/१२/२०१३ रोजी दुपारी ३.०० वा. महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली आहे. सोबत सभेची कार्यपत्रिका जोडली आहे. सभेस आपण उपस्थित रहावे ही विनंती.

आपला विश्वासू,

नगरसचिव
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८.

प्रत -

१) सर्व संबंधित शाखाप्रमुख व शाखाधिकारी
२) कार्यालयीन नोटीस बोर्ड

पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी – १८.
मा.शहर सुधारणा समिती
**कार्यपत्रिका क्रमांक – १३**

दिनांक :- ०४/१२/२०१३ वेळ - दुपारी ३.०० वाजता

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.शहर सुधारणा समितीची पाक्षिक सभा बुधवार दिनांक ०४/१२/२०१३ रोजी दुपारी ३.०० वा. महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली आहे. सभेत खालील कामकाज होईल.

----------

दिनांक २०/११/२०१३ व २२/११/२०१३ रोजी झालेल्या सभेचा **(कार्यपत्रिका क्रमांक १२)** सभावृत्तांत कायम करणे.

---------

**विषय क्र.१)** पिंपरी चिंचवड मनपा हद्दीत चाकण, देहू, आळंदी, हिंजवाडी, म्हाळुंगे, मोई,मारुंजी व इतर परिसराचा समावेश करणेबाबत शासनास मनपाचे अभिप्राय सादर करणेपूर्वी सर्व पदाधिकारी यांची बैठक दि.३०/०८/२०१३ रोजी मा.आयुक्त यांचे कक्षात घेण्यात आली. सदर बैठकीत मनपा हद्दीच्या उत्तरेकडील १४ गावे आणि मनपा हद्दीच्या पश्चिमेकडील ६ गावे मनपा हद्दीत समावेश करणेबाबत सविस्तर चर्चा करणेत आली आणि सदर हद्दवाढीचा प्रस्ताव मा.शहर सुधारणा समिती मार्फत मा.महापालिका सभेपुढे सादर करणेबाबत चर्चा झाली तथापि सद्यस्थितीत मनपा हद्दीला लागून असलेली गावे मनपा हद्दीत समाविष्ट करणे योग्य होईल. त्यानुसार खालील नमुद मनपा हद्दीच्या उत्तरेकडील आळंदी, चिंबळी, कुरुळी, मोई, निघोजे, देहू, विठ्ठलनगर आणि मनपा हद्दीच्या पश्चिमेकडील गहुंजे, जांबे, मारुंजी, हिंजवाडी, माण, नेरे, सांगवडे ही मनपा हद्दीला लागून असलेली एकूण १४ गावे मनपा हद्दीत समाविष्ट करणेस मान्यता देणेकामी मा.महापालिका सभेकडे शिफारस करणेबाबत विचार करणे.

( दिनांक ०४/१२/२०१३ चे सभेत घेणेचे निर्णयाप्रमाणे )

**विषय क्र.२)** पिंपरी चिंचवड मनपा हद्दीत चाकण, देहू, आळंदी, हिंजवाडी, म्हाळुंगे, मोई,मारुंजी व इतर परिसराचा समावेश करणेबाबतचा विषय मा.महापालिका सभेपुढे सादर केलेला असल्याने मा.आमदार श्री.दिलीप मोहिते यांचे दि.१०/०९/२०१३ चे पत्र व त्यासोबतची सहपत्रे त्या विषयात सादर करणेकामी मा.महापालिका सभेकडे शिफारस करणेबाबत विचार करणे.

( दिनांक ०४/१२/२०१३ चे सभेत घेणेचे निर्णयाप्रमाणे )

**विषय क्र.३)** अ प्रभाग समिती ठराव क्र.१९२ दिनांक २३/०९/२०१३ नुसार चिखली जाधववाडी मधील गट नं.६५० ते गट नं.६८० मधून जाणारा १२ मिटर रस्ता हा नविन मंजूर आराखडया- -नुसार ( कलम ३७ नुसार ) न करता जुन्या वहिवाटीनुसार करणेस मान्यता देणेबाबत विचार करणे.

( दिनांक ०४/१२/२०१३ चे सभेत घेणेचे निर्णयाप्रमाणे )

**विषय क्र.४)** अ प्रभाग समिती सभा दिनांक ०९/१०/२०१३ ठराव क्रमांक १९५ नुसार पिंपरी चिंचवड महानगरपालिकेचे आकुर्डी रुग्णालयामध्ये प्रसुतीगृह,कुटूंबकल्याण, जन्ममृत्यू व दैनंदिन रुग्ण तपासणीची कामे केली जातात. सदर रुग्णालय हे अपुरे पडत असून त्याचा विस्तार करणे अत्यंत गरजेचे आहे. रुग्णालयाचे शेजारी आरक्षण क्र.२७१ ही अडीच एकर जागा आहे. या जागेवर असलेले खाजगी शाळेचे आरक्षण रद्द करुन ती जागा रुग्णालयाच्या विस्तारासाठी आरक्षित करणेस मान्यता देणेकामी मा.महापालिका सभेकडे शिफारस करणेबाबत विचार करणे.

**विषय क्र.५)** अ प्रभाग समिती सभा दिनांक ०९/१०/२०१३ ठराव क्रमांक १९६ नुसार प्रभाग क्र.१६ मध्ये जय-गणेश व्हिजन या संस्थेने महापालिकेस ओपन स्पेसचे माध्यमातून दोन एकर जमीन ताब्यात दिली असून ती जमीन मनपाचे ताब्यात आहे. सदर जागेचा आरक्षण क्र.१७१ आहे व ती एल आकाराची आहे. प्रस्तुत जागेपैकी एक एकर जागेमध्ये खेळाचे मैदान विकसित करणेस व एक एकर जागेमध्ये गार्डन विकसीत करणेस मान्यता देणेकामी मा.महापालिका सभेकडे शिफारस करणेबाबत विचार करणे.

**विषय क्र.६)** अ प्रभाग समिती सभा दिनांक ०९/१०/२०१३ ठराव क्रमांक १९९ नुसार कुदळवाडी जाधववाडी हा प्रभाग समाविष्ट गावातील असून वाढत्या लोकसंख्येचा विचार करता कुदळवाडी जाधववाडी प्रभाग क्र.५ मधील मंजूर विकास आराखडयातील गट नं.९८६, ९७०, ९७१, ९६४, ९२७, ९०१ या गटातील १८ मीटर रस्त्याचे आरक्षण असून त्या रस्त्याची हद्द कायम करणेस मान्यता देणेबाबत विचार करणे.

नगरसचिव
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८. नगरसचिव कार्यालय,
क्रमांक - नस/४/कावि/ ११२२ /२०१३
दिनांक - २८/११/२०१३.

टिप - प्रस्तुत कार्यपत्रिकेवरील विषयाचे विषयपत्र (डॉकेट) नगरसचिव कार्यालयात वाचणेसाठी ठेवणेत आले आहे.

\\Nagersachiv4\nnn\Nagersachiv1/shsu-१३-१४\agenda13doc.